# मुंबई ग्राहक पंचायत

(सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक : एफ - ७००० मुंबई) सोसायटी रजि नं. ४१७/४१३१३५०
ग्राहक भवन, संत ज्ञानेश्वर मार्ग, जे.व्ही.पी.डी. मार्केट, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६.
दूरध्वनी : (०२२) ४७५० ८५४१ / ४७५० ८५४२
Email : mpanchayat@gmail.com • Website : https//www.mymgp.org

## ४३वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## (२०२३-२४)

## सूचना

मुंबई ग्राहक पंचायतीच्या सभासदांची ४३वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी, दुपारी २.३० वा. उपनगर शिक्षण मंडळाचे विद्यानिधी शाळा सभागृह, विद्यानिधी मार्ग, किशोर कुमार उद्यानाजवळ, जुहू, विलेपार्ले (प) येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील कामकाज

१. सभेची सूचना वाचणे.

२. रविवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२३ रोजी घेण्यात आलेल्या ४२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी घेणे.

३. संस्थेच्या घटनेतील तरतुदीनुसार संस्थेच्या कार्यकारिणीवरील ८ सदस्य ४ वर्षाची मुदत संपत असल्याने यंदाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये निवृत्त होत आहेत. त्यापैकी ५ सदस्य खुल्या गटातील असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्रीम. अनिता खानोलकर २) श्रीम. शीला देवळेकर ३) श्री. पराग रेडकर
४) श्रीम. छाया वारंगे ५) श्री. राजेंद्र राणे

कार्यकारिणी सदस्यांच्या रिक्त होणाऱ्या वरील पाच जागांसाठी पाचपेक्षा जास्त वैध उमेदवारी अर्ज आल्यास निवडणूक घेऊन निकाल घोषित करणे.

तसेच आरक्षित क्षेत्रातून निवडून आलेले तीन कार्यकारिणी सदस्य त्यांची ४ वर्षांची मुदत संपत असल्याने निवृत्त होत आहेत. त्यांची नावे आणि संबंधित आरक्षित क्षेत्र पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्री. प्रभाकर गवाणे (ठाणे वितरण केंद्र कार्यकक्षा) २) श्री. रविंद्र सहस्त्रबुद्धे (पालघर वितरण केंद्र कार्यकक्षा)
३) श्री. अभय जोशी (रायगड वितरण केंद्र कार्यकक्षा)

आरक्षित क्षेत्रातील जागांसाठी केवळ संबंधित वितरण केंद्र कार्यकक्षेतील (उमेदवारीच्या अन्य अटी पूर्ण करत असणारे) सभासदच उमेदवारी अर्ज भरू शकतात. संबंधित वितरण केंद्र कार्यकक्षेतून एकापेक्षा जास्त वैध उमेदवारी अर्ज आल्यास त्या पदासाठी निवडणूका घेऊन निकाल घोषित करणे.

**आरक्षित क्षेत्रातील मतदान केवळ त्या क्षेत्रातील मतदारांपुरते मर्यादित नसून खुल्या आणि सर्व आरक्षित क्षेत्रातील संघप्रमुख मतदार आणि सहयोगी सभासदांचे मतदार प्रतिनिधी मतदान करू शकतील.**

निवृत्त होणारे वरील सर्व उमेदवार, अन्य अटी/शर्तींची पूर्तता करत असल्यास, पुन्हा उमेदवारी अर्ज भरण्यास पात्र आहेत.

४. मुंबई ग्राहक पंचायतीचा १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीचा कार्य अहवाल सादर करून, त्यास मान्यता घेणे.

५. सन २०२३-२४ या वर्षाच्या लेखापरीक्षीत हिशेबाची पत्रके, ताळेबंद, हिशोब तपासणीचा अहवाल सादर करणे व मंजूर करणे.

६. १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या काळाकरिता वैधानिक हिशोब तपासनिसाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७. २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी कार्यकारी मंडळाने सादर केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.

८. संस्थेच्या ग्राहक भवन या इमारतीच्या प्रस्तावित पुनर्विकासाबाबत अद्ययावत माहिती देणे.

९. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

दिनांक : १ ऑक्टोबर २०२४

**अनिता खानोलकर**
कार्यवाह

**सूचना –**

१) नियत गणसंख्येच्या (मतदानाचा हक्क असणारे ५० सदस्य) अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच स्थळी दुपारी ठीक ३.०० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) वार्षिक अहवाल आणि हिशेबाबाबत कोणतेही प्रश्न असल्यास संबंधितांनी सभेच्या किमान पाच दिवस आधी कार्यवाहांना ग्राहक भवनच्या पत्त्यावर लेखी कळवावे.

३) संस्थेचा ४३वा वार्षिक अहवाल मुंबई ग्राहक पंचायतीचे ग्राहक भवन, पार्ले गोडाऊन, ठाणे वितरण केंद्र, पालघर वितरण केंद्र, रायगड वितरण केंद्र (पेण), वसई वितरण केंद्र व पुणे वितरण केंद्र येथे आणि ऑनलाईन सभासदांच्या अवलोकनार्थ शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४ पासून उपलब्ध असेल.

| निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केलेला निवडणूक कार्यक्रम | | |
|---|---|---|
| १. | नामनिर्देशन पत्रांची उपलब्धता (ग्राहक भवन, विलेपार्ले गोडाऊन, ठाणे वितरण केंद्र, पालघर वितरण केंद्र, रायगड वितरण केंद्र (पेण), वसई वितरण केंद्र, पुणे वितरण केंद्र) | सोमवार २१ ऑक्टोबर ते सोमवार २८ ऑक्टोबर २०२४ |
| २. | योग्यरितीने भरलेल्या नामनिर्देशन पत्रांचा स्वीकार (फक्त ग्राहक भवन येथे सकाळी १० ते सायं. ४ वाजेपर्यंत) | सोमवार २१ ऑक्टोबर ते बुधवार ०६ नोव्हेंबर २०२४ |
| ३. | वैध उमेदवारांची यादी जाहीर करणे (स्थळ : ग्राहक भवन) सायंकाळी ५ वाजता | बुधवार ०६ नोव्हेंबर २०२४ |
| ४. | उमेदवारी मागे घेण्याची तारीख (फक्त ग्राहक भवन येथे प्रत्यक्ष येऊन लेखी, स्व-हस्ताक्षरीत फॅक्सद्वारे अथवा स्वतःच्या ई-मेलद्वारे कळविणे) सायंकाळी ४ वाजेपर्यंत | सोमवार ११ नोव्हेंबर २०२४ |
| ५. | उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करणे (स्थळ : ग्राहक भवन) सायंकाळी ५ वाजता | सोमवार ११ नोव्हेंबर २०२४ |
| ६. | अंतिम यादीत कार्यकारिणीवरील ४ वर्षे कालावधी असलेल्या ८ जागांसाठी ८ पेक्षा जास्त उमेदवार असल्यास निवडणूक घेणे. | **रविवार २४ नोव्हेंबर २०२४** वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये |

**श्रीम. पूर्णिमा राव**
निवडणूक निर्णय अधिकारी

**महत्त्वाचे –**

❖ उमेदवार, सूचक व अनुमोदक हे ३० जून २०२४ रोजी संस्थेचे ग्राहक संघ सभासद अथवा सहयोगी सभासद असणे व त्यांनी २०२४-२५ चे सभासद शुल्कही भरलेले असणे आवश्यक आहे.

❖ उमेदवारांनी पुढीलपैकी एका अटीची पूर्तता करणे अनिवार्य आहे.
अ) उमेदवार १ सप्टेंबर २०२४ च्या पूर्वी किमान पाच वर्षे सलगपणे संस्थेचा सभासद असावा, किंवा
ब) उमेदवाराने संस्थेच्या कोणत्याही कार्यकारी विभागात १ ऑक्टोबर २०२४ पूर्वी किमान तीन वर्षे सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम केलेले असावे.

❖ निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क, कमीत कमी ११ सभासद असलेल्या आणि ३० जून २०२४ रोजी नोंदणीकृत असलेल्या ग्राहक संघाच्या संघप्रमुखासच असेल. त्याच्या अनुपस्थितीत मतदानाचा हक्क संबंधित संघप्रमुखाने प्राधिकृत केलेल्या त्याच ग्राहक संघाच्या संघ सभासदास राहील. तसे अधिकार पत्र संघप्रमुखाने त्या संघ सभासदास देणे आवश्यक आहे. १५ सहयोगी सदस्यांनी नियुक्त केलेल्या व तसे अधिकारपत्र असलेल्या एका सहयोगी सभासदास मतदानाचा अधिकार राहील.

❖ मतदानास पात्र असलेल्या संघप्रमुखांची तसेच सहयोगी सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयात दि. १४ ऑक्टोबर २०२४ पासून उपलब्ध असेल.